*(A High Impact Factor, Quarterly, Peer Reviewed, Referred & Indexed Journal)*

***NAVJYOT / Vol. XII / Issue - II*** ***ISSN 2277- 8063***

# समाज सुधारणेत सावित्रीबाई फुले यांचे योगदान

**डॉ. हणमंत बाळकृष्ण नागणे,** इतिहास विभाग, सांगोला महाविद्यालय, सांगोला,

naganehb@gmail.com

---

**प्रस्तावना:**

समाजसुधारणेच्या दृष्टिकोनातून अभ्यास करताना 19 वे शतक भारतासाठी अनेक बाबींनी क्रांतिकारक शतक मानले जाते. विसाव्या शतकातील विकासाचे बीजारोपण 19 व्या शतकामध्येच झाले होते असे म्हटले तर ते फारसे वावगे ठरणार नाही. भारतामध्ये इंग्रजी राजवट स्थिरावल्यानंतर भारतीय समाज जीवनात जे बदल घडवून आणले गेले त्यामुळे भारताची आधुनिक युगात प्रवेश होण्यास मदत झाली. इंग्रजांनी भारतीयांना शिक्षण देण्यासाठी काही प्रयत्न केले व यामुळे भारतामध्ये नवशिक्षित समाज सुधारक निर्माण होऊ लागले. मध्ययुगीन समाज व्यवस्थेमध्ये ज्या काही चुकीच्या सामाजिक धार्मिक परंपरा होत्या त्याची निरर्थकता लोकांना समजू लागली. समाजसुधारणेमध्ये समाज प्रबोधनाच्या विचारांना चालना मिळाली धार्मिक विचार स्वातंत्र्य, आचारांचे परीक्षण त्यावर टीका व सुधारणा या गोष्टी मध्ययुगात शक्य नव्हते त्या गोष्टी या शतकामध्ये शक्य झाल्या. इंग्रजांनी भारतीय मुलींसाठी शिक्षण सुरू केल्यानंतर महात्मा फुले व क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांनी या कार्याला सुरुवात केली. फुले दांपत्याने शिक्षणाबरोबरच समाज सुधारणेमध्ये आपले बहुमोल योगदान दिल्यामुळेच विसाव्या शतकातील समाज सुधारणेला एक योग्य दिशा मिळाली.

**पार्श्वभूमी:**

सावित्रीबाईंचा जन्म ३ जानेवारी १८३१ रोजी नेवसे पाटील घराण्यात पुणे जिल्ह्यातील नायगाव या ठिकाणी झाला. तत्कालीन रूढी परंपरेनुसार सावित्रीबाईंचे वय नऊ वर्षाचे असताना तेरा वर्षीय जोतिराव फुलेंबरोबर त्यांचा विवाह मोठ्या थाटामाटात पार पडला. विवाहनंतर लवकरच सावित्रीबाई जोतिरावांच्या विचारांशी व कार्याशी समरस झाल्या. सावित्रीबाईंना विवाहापूर्वी एका ख्रिश्चन मिशनऱ्याने येशू ख्रिस्ताचे चरित्र भेट दिले होते. या पुस्तकातील फक्त चित्रेच पाहता येतात काही वाचता येत नाही याची खंत सावित्रीबाईंना होती. विवाहनंतर हे पुस्तक त्यांनी आपल्या बरोबर सासरी आणले होते. जोतिराव हे केवळ प्रेमळ पतीच नाहीत तर एक उत्कृष्ट शिक्षक आहेत याची प्रचिती सावित्रीबाईंना लवकरच येऊ लागली. अगोदरच शिक्षणाची मनस्वी आवड आणि त्यातून पतीची शिक्षणासाठी साथ यातून सावित्रीबाई शिकू लागल्या. सावित्रीबाईंच्या शिकण्याच्या या आवडीमुळे व पतीच्या साथीमुळे त्या शिकण्यासाठी शाळेत दाखल झाल्या व अध्यापक होण्यापर्यंतचा त्यांचा प्रवास पूर्ण झाला. सावित्रीबाईंमुळे एक खात्रीलायक शिक्षिका जोतिरावांना मिळाली. फातिमा शेख सारख्या इतरही शिक्षिका तयार झाल्या व स्त्रिया, शूद्र यांना शिकवण्याचे जोतिरावांचे स्वप्न साकार होऊ लागले.

**ग्रहत्यागाचा प्रसंग:**

स्त्रियांना, शूद्रांना शिक्षण दिले पाहिजे तरच भारतामध्ये सामाजिक सुधारणा घडून येईल व एक सदृढ राष्ट्र निर्माण होईल हे जोतीरावांनी जाणले होते म्हणूनच या विचाराने जोतिराव झपाटले होते. यातूनच त्यांनी इ. स. 1848 मध्ये पुण्यामध्ये बुधवार पेठ येथील भिडे वाड्यामध्ये मुलींना शिक्षण देण्यासाठी शाळा सुरू केली. या शाळेत शिकवण्यासाठी शिक्षक मिळेनात म्हणून जोतिरावांनी ही जबाबदारी आपली पत्नी सावित्रीबाईंवर सोपविली. सावित्रीबाई शिक्षिका म्हणून काम पाहणाऱ्या पहिल्या भारतीय महिला ठरल्या. तत्कालीन कालखंडामध्ये धर्म मार्तंडाच्या ,सनातनी प्रवृत्तीच्या लोकांच्या दृष्टीने स्वतःच्या पत्नीला शिकविणे व त्या दोघांनी मिळून स्त्रिया, शुद्र,अतिशुद्रांना शिक्षण देणे म्हणजे धर्माच्या विरोधातील काम होते. आणि म्हणून तत्कालीन सनातनी मनोवृत्तीच्या लोकांनी धर्म बुडाला धर्म बुडाला गोविंदरावांच्या सुनेने धर्म बुडविला असा कांगावा करून गोविंदरावावर बहिष्कार टाकण्याची धमकी दिली परिणामी जोतिबा व सावित्रीबाई यांना घर सोडावे लागले. पतीच्या सुखदुःखात, समाज कार्यात साथ देण्यासाठी या माऊलीने पतीबरोबर घराचा उंबरठा ओलांडला. ग्रह त्यागानंतर उस्मान शेख नावाच्या

मित्राच्या घरी जोतिराव पत्नीसह राहण्यास गेले.परंतु ते आपल्या कार्यापासून यत्किंचितही डगमगले नाहीत. शाळेत शिकवण्यासाठी जाताना सावित्रीबाईंना सनातनी लोकांकडून दगडफेक, शेणविटा चिखल फेक ,टिंगल टवाळकी या गोष्टींना सामोरे जावे लागले परंतु त्या अजिबात डगमगल्या नाहीत उलट त्या नेटाने आपले कार्य करतच राहिल्या. माझा एवढा अपमान छळ होतो तर माझ्यासारख्या लाखो भगीणींचा, शूद्र बांधवांचा किती छळ होत असणार या कल्पनेने त्या पछाडल्या होत्या. स्त्रियांना शिक्षण देऊन त्यांचा उद्धार करण्याची खूणगाट त्यांनी आपल्या मनाशी बांधली होती आणि त्यामध्ये त्या यशस्वीही झाल्या.

**प्रेमळ व संवेदनशील अध्यापिका:**

सावित्रीबाईंनी जोतिबांच्या साथीने व आपल्या कर्तुत्वाने स्त्री शिक्षणाची पायाभरणी केली. सावित्रीबाई सारखी सुसंस्कारीत, प्रेमळ ,सहृद्य व संवेदनशील अध्यापिका लाभल्यामुळे जोतिबा फुले यांच्या शिक्षण प्रसाराचा डोलारा समर्थपणे उभा होऊ शकला. सावित्रीबाईंनी मुलींच्या शाळेत दाखल झालेल्या विविध जातीतील कोवळ्या मुलींना प्रथम मातेची ममता दिली त्या मुलींना शालेय वातावरणात रममाण होण्यासाठी प्रयत्न केले. मुलींच्या पालकांची समजूत घालून वैयक्तिक संपर्क साधून मुलींना शाळेत ने-आण करण्याच्या दृष्टीने सोयी उपलब्ध करून मातेच्या प्रेमळ अंतकरणाने मुलींच्या शिक्षणाची पायाभरणी केली. यावेळी सावित्रीबाईंनी स्वतःचे मातृत्वच पणास लावले होते असे म्हटले तर वावगे ठरणार नाही.सावित्रीबाईंनी तत्कालीन समाजकंटकांकडून,धर्माच्या ठेकेदारांकडून होणारा त्रास सहन करून आपल्या प्रेमळ व संवेदनशील स्वभावाने सर्व प्रतिकूल परिस्थितीवर मात करत आपले अध्यापनाचे कार्य नेटाने,जोमाने सुरू ठेवले होते. समाजात परिवर्तन करण्यासाठी, समाज सुधारणा करण्यासाठी शिक्षणाशिवाय दुसरा पर्याय नाही आणि अज्ञानामुळेच बहुजन समाजाचा आणि पर्यायाने आपल्या देशाचा विकास खुंटला आहे याची जाणीव फुले दाम्पत्यांना होती. यासाठीच शिक्षणाची सोय आणि प्रसार करणे त्यांना आवश्यक वाटत होते. शिक्षणाचा प्रसार होण्यासाठी त्यांनी फीमेल नेटिव्ह स्कूल्स, दि सोसायटी फॉर प्रमोटिंग दि एज्युकेशन ऑफ महार माग्ज अँड एक्स्ट्राज अशा दोन शैक्षणिक संस्था सुरू केल्या. या शैक्षणिक संस्थांच्या माध्यमातून काम करताना क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांनी शिक्षिका,मुख्याध्यापिका आणि संस्थाचालक म्हणून काम केले. समाजातील सर्वांना शिक्षण मिळण्यासाठी प्रथमता शैक्षणिक गळती रोखणे महत्त्वाचे होते त्यासाठी गरीब मुला मुलींना पगार देण्याची व्यवस्था केली. सन 1854 मध्ये सावित्रीबाईंनी प्रौढ शिक्षण सुरू केले. सक्तीचे मोफत शिक्षण असावे असा आग्रह धरणारे आशिया खंडातील पहिले आदर्श फुले दांपत्य आहे. समाज सुधारणा आणि महिलांचे शिक्षण या कार्यासाठी लहुजी वस्ताद साळवे, राणबा महार, गणू शिवाजी मांग, धुराजी आप्पाजी चांभार, फातिमा शेख,उस्मान शेख, मुनशी गफार बेग,लिजीट साहेब यांचे योगदानही महत्त्वाचे ठरले .समाजसुधारणा करण्यासाठी सर्वांचा सहभाग घेत त्यांनी आदर्श असे कार्य केले.

**महिलांच्या हितासाठी कार्य:**

महिलांच्या शिक्षणाबरोबरच महिलांच्या सामाजिक समस्या सोडवणे गरजेचे होते यासाठी क्रांतिज्योती सावित्रीबाईंनी विविध कामे केली. विधवा पुनर्विवाह विधवांच्या बाळंतपणासाठी आणि त्यांच्या अपत्यांच्या संगोपणासाठी बालहत्या प्रतिबंधक ग्रहाची स्थापना सन १८६३ साली केली. विधवा विवाहास प्रोत्साहन देण्याचे कार्य सुरू केले. विधवांचे केशवपण थांबण्यासाठी नाभिक बांधवांचा संप घडवून आणला. बालहत्या प्रतिबंधक ग्रह व अनाथ बालकाश्रम चालू ठेवण्याकरता सावित्रीबाईंचा प्रेमळ, मनमिळावू स्वभाव त्यांची मातृत्वाची भावना विशेषरित्या कारणीभूत ठरल्या होत्या. काशीबाई या ब्राह्मण विधवेच्या मुलाची नाळ सावित्रीबाईंनी कापल्याचा उल्लेख जोतिरावांनी आपल्या मृत्युपत्रात केला आहे. या ब्राह्मण विधवेच्या मुलालाच फुले दांपत्याने दत्तक घेतले होते. सन 1877 साली भारताच्या अनेक भागात दुष्काळ पडला होता. या काळात फुले दांपत्यांनी काही दानशूर लोकांच्या सहकार्याने अन्नछत्र उघडली. अनाथ मुला मुलींसाठी व्हिक्टोरिया बालकाश्रम सुरू केले. अन्नछत्रांचे नियोजन करण्यात व प्रत्यक्ष अन्न शिजवून त्याचे गोरगरिबांना वाटप करण्यात सावित्रीबाईंनी प्रत्यक्ष सहभाग घेतला व अनेक लहान मुलांना आईच्या प्रेमाने भरवले व त्यांना जीवदान दिले. सावित्रीबाईंच्या मातृ प्रेमाबद्दल लक्ष्मण कराडी हा विद्यार्थी लिहितो की सावित्रीबाई सारखी दयाळू व प्रेमळ अंतकरणाची स्त्री मी अजून कोठेही पाहिलेली

नाही त्या आमच्यावर आई पेक्षाही जास्त प्रेम करत असत. महादू वाघोले हा विद्यार्थी सांगतो की सावित्रीबाई उदार अंत:करणाच्या असल्यामुळे त्या गरीब महिलांना त्यांच्या घरची लुगडी देत असत. हुंडापद्धत रोखण्यासाठी सत्यशोधक विवाह पद्धती सुरू केली. यात सावित्रीबाईंचे योगदान अत्यंत महत्त्वाचे होते. 25 डिसेंबर 1873 रोजी सावित्रीबाई यांच्या नेतृत्वाखाली पहिला सत्यशोधक विवाह लावण्यात आला. सावित्रीबाईंचे संपूर्ण आयुष्य म्हणजे एक धगधगता संघर्षमय अग्निकुंडच होता.

एका स्त्रीने यशस्वीपणे शाळा चालवून स्त्री शूद्रांना विद्या शिकवणे प्रौढ स्त्रियांसाठी शाळा काढणे पतीत विधवांच्या निष्पाप मुलांना ओटीत घेऊन त्या विधवांचे अश्रू पुसणे , जोतिरावांच्या निधनानंतरही सत्यशोधक समाजाचे समर्थ नेतृत्व करणे, दुष्काळी परिस्थितीत अनाथ जीवांच्या मुखात घास भरवणे आणि आपल्या स्वतःच्या आयुष्याच्या शेवटच्या टप्प्यात सुद्धा प्लेग साथीच्या काळात दिन दुबळयांची सेवा करताना स्वतःच्या जीवाचाही विचार न करणे हे सगळे फक्त आणि फक्त सावित्रीबाई फुले करू शकतात याची प्रचिती येते. प्लेगच्या साथीच्या काळात एका प्लेग झालेल्या हरिजन मुलाला आपल्या खांद्यावरून उपचारासाठी दवाखान्यात नेत असताना सावित्रीबाईंनाच प्लेग रोगाचा प्रादुर्भाव झाला आणि यामध्येच 10 मार्च 1897 रोजी सावित्रीबाई नावाची दिव्य ज्योत मालवली. परंतु त्यांच्या अजोड अशा कार्यामुळे त्या कायमस्वरूपी अजरामर होऊन गेल्या.

**समारोप :-**

विसाव्या शतकामध्ये भारतामध्ये ज्या सामाजिक आणि राजकीय चळवळी उभारल्या गेल्या त्याचे बीजारोपण एकोणिसाव्या शतकामध्ये ज्या समाज सुधारकांनी केले त्यामध्ये क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले या अग्रगणी होत्या.स्वातंत्र्यानंतर महिलांनी सामाजिक आणि राजकीय क्षेत्रामध्ये दैदीप्यमान यश संपादन करून आपल्या कार्याने स्त्री कर्तुत्वाचा ठसा उमटविला व सावित्रीबाईंच्या कार्याला एक प्रकारे वंदनच केले.

**संदर्भ ग्रंथ :-**

1. प्रा.ना.ग.पवार , सावित्रीबाई फुले: अष्टपैलू व्यक्तीमत्व ,पद्मगंधा प्रकाशन, पुणे, २००४

2. नरके हरी (संपादक),महात्मा फुले गौरव ग्रंथ, म.जो.फुले चरित्र साधने प्रकाशन समिती, महाराष्ट्र शासन,मुंबई. १९९१

3. डॉ.कठारे अनिल, भारतीय स्त्री चळवळीचा इतिहास, एज्युकेशनल पब्लिशर्स एंड डिस्ट्रीब्युटर्स, औरंगाबाद , २०१३

4. प्राचार्य चंद्रकांत घुमटकर,महाराष्ट्रातील समाजप्रबोधांचे प्रणेते ,स्नेहवर्धन प्रकाशन, पुणे.२००७

5. गोरे प्रेमा,थोर समाजसेविका सावित्रीबाई फुले,श्रीविद्या प्रकाशन ,पुणे ,१९८१